शनिवार दि.२७ एप्रिल २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २४४
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
दैनिक बीड लोकनेता
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

# जनशक्ती विरुद्ध धनशक्ती:निवडणुकीच्या मध्यात इथेनॉल बंदी उठवली;हा वंचितच्या मागणीचा विजय-प्रकाश आंबेडकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अकोला (वृत्तसंस्था)**

अकोला लोकसभा मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीच्या वतीने वंचितचे नेते प्रकाश आंबेडकर हे निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यांच्या विरोधात भारतीय जनता पक्षाचे अनुप धोत्रे तर काँग्रेसच्या वतीने अभय पा टील हे मैदानात आहेत. या मतदारसंघात जनशक्ती विरुद्ध धनशक्ती अशी लढाई असल्याचा दावा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आला आहे. निवडणुकीच्या आधी प्रचाराला बंदी असताना देखील सर्वच वर्तमानपत्रांमध्ये जाहिराती छापून आल्या असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे.प्रकाश आंबेडकर यांनी अकोला लोकसभा मतदारसंघांमध्ये मतदान केले. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी देखील संवाद साधला. भारतीय जनता पक्षाच्या केंद्रातील सरकारने निवडणुकीच्या मध्येच इथेनॉल संदर्भात महत्त्वाचा निर्णय जाहीर केला आहे. यावर प्रकाश आंबेडकर यांनी टीका केली. वास्तविक इथेनॉल वरील बंदी उठवण्याची भूमिका वंचितच्या वतीने घेण्यात आली होती. त्यासाठी केंद्र सरकारवर वंचितच्या वतीने दबाव टाकण्यात आला होता. त्यामुळे हा निर्णय म्हणजे वंचित बहुजन आघाडीच्या मागणीला आलेले यश असल्याचे मत प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केला आहे.अकोला लोकसभा मतदारसंघामध्ये काँग्रेस पक्षाचे उमेदवार अभय पाटील, वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार प्रकाश आंबेडकर आणि भारतीय जनता पक्षाचे उमेदवार अनुप धोत्रे या तीन प्रमुख उमेदवारांमध्ये लढत होत आहे. निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या मर्यादेमध्ये आम्ही खर्च केला असल्याचा दावा प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. मात्र दुसरीकडे अकोलाच नाही तर



बुलडाणा, हिंगोली, नांदेड, परभणी, यवतमाळ, अमरावती या सर्वच मतदारसंघांमध्ये काँग्रेस आणि भारतीय जनता पक्षाच्या बातम्या आणि जाहिराती आजच्या वर्तमानपत्र मध्ये दिसून येत आहे. वास्तविकेची याची जबाबदारी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी घ्यायला हवी होती. मात्र, तसे झाले नसल्याचा आरोप प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. यासंदर्भात निवडणूक आयोग काय कारवाई करतो? आम्ही पाहणार असल्याचे देखील प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.इथेनॉल वरील बंदी उठवण्याची मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आली होती. मात्र सरकारी पक्षाच्या वतीने त्याकडे दुर्लक्ष केले गेले. आता निवडणुकीच्या तोंडावर मतदानाच्या एक दिवस आधी इथेनॉल वरील बंदी उठवण्यात आली आहे. हा वंचितचा विजय आहे. मात्र निवडणूक जाहीर झालेली असताना आचार संहितेच्या काळात असा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे आता निवडणूक आयोग यावर काय कारवाई करतो, हे देखील आम्ही पाहणार असल्याचे वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे. वास्तविक सत्ताधारी पक्षाच्या उमेदवारांसाठी सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर आदी भागांमध्ये इथेनॉल बंदीमुळे चांगले चित्र नव्हते. आता ही बंदी उठवण्यात आली आहे. हा निर्णय आचारसंहितेत घेण्यात आला आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाने यावर कारवाई केली पाहिजे, अशी मागणी वंचितच्या वतीने करण्यात आली आहे.पश्चिम महाराष्ट्र मराठवाडा आणि विदर्भात असे महत्त्वाचे उत्पादन पीक मानले जाते याबरोबरच उत्तर प्रदेश मध्ये देखील उसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जातात त्यामुळे यामध्ये राज्यातील मतदारसंघांमध्ये देखील इथेनॉल बंदी उठवण्याचा परिणाम दिसून येणार आहे निवडणुकीच्या मध्यावर हा निर्णय घेण्यात आला असला तरी देखील सत्य असलेल्या भाजपा सरकारवर किती दबाव आहे हे पाहणे महत्त्वाचे ठरेल असे देखील प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.

# निवडणूक निरीक्षक श्रीमती एम.एस. अर्चना यांची पहाटेच मतदान केंद्राला भेट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । सय्यद रहीम रजा**

लोकसभा मतदार संघासाठी नियुक्त निवडणूक निरीक्षक श्रीमती एम. एस. अर्चना यांनी आज पहाटे ५.४५ वाजता सरजू देवी भिकुलाल आर्य कनिष्ठ महिला महाविद्यालयातील मतदान केंद्रावर जावून निवडणूक यंत्रणेच्या तयारीची पाहणी केली. तसेच श्रीमती अर्चना व निवडणूक खर्च निरीक्षक श्री. अन्वर अली यांनी ही सिटी क्लब येथील सखी मतदान केंद्राला भेट देऊन पाहणी केली.

यावेळी उपविभागीय अधिकारी तथा सहायक निवडणूक अधिकारी उमाकांत पारधी, तहसीलदार नवनाथ वगवाड यांच्यासह निवडणूक कामी नियुक्त कर्मचारी उपस्थित



होते.

श्रीमती एम.एस.अर्चना यांनी यावेळी सिटी क्लब येथील मतदान केंद्र क्र. २८६ येथील महिला कर्मचारी संचालित सखी मतदान केंद्रवरील पॉईंटवर सेल्फी घेत जास्तीत जास्त मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन केले. याशिवाय त्यांनी माणिक स्मारक येथील दिव्यांग कर्मचारी संचलित मतदान केंद्रांवर दिव्यांग मतदान केंद्राचीही भेट देत पाहणी केली.

# चारठाणा येथे ५९.४७ टक्के मतदान ,एकूण ७०६३ मतदारांपैकी ४२०१ मतदारांनी बजावला मतदानाचा अधिकार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**चारठाणा । श्रीपाद जोशी**

येथे १७ परभणी लोकसभेसाठी शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली असता या मतदान प्रक्रियेत चारठाणा येथील एकूण सहा मतदान बुधवर ७०६३ मतदारांपैकी ४२०१ जणांनी मतदानाचा हक्क बजावला बुथ क्रमांक ७४ वर एकूण १०९८ मतदारांपैकी ६०६ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला या बूथवर ५५.१९ टक्के मतदान झाले तर बुथ क्रमांक ७५ वर १०५७ मतदारांपैकी ६१७ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला या बुथवर ५८.३७% मतदान झाले बुध क्रमांक ७६ वर एकूण १२५७ मतदारांपैकी ७४९ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला या बुथवर ५९.५८% मतदान पार पडले बूथ क्रमांक ७७ वर १२०३ मतदारांपैकी ७१३ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला या बूथवर ५९.२६ टक्के मतदान झाले बूथ क्रमांक ७८ वर १२८५ मतदारांपैकी ८२४ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला या बुधवर सर्वाधिक ६४.१२ टक्के मतदान झाले तर बूथ क्रमांक ७९ वर ११६३ मतदारांपैकी ६९२ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला या बुथवर ५९.५०% मतदान झाले एकूण ७०६३ मतदारांपैकी ४२०१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावल्याने एकूण चारठाण्यात ५९.४७% मतदान झाल्याचे चित्र पाहावयास मिळाले बूथ क्रमांक ७५, ७६,७७ व ७९ या बुथवर सर्व समान मतदानाची टक्केवारी राहिली असली तरी बूथ क्रमांक ७४ वर अत्यल्प म्हणजे ५५.१९ % मतदान झाल्याचे चित्र पहावयास मिळाले तर बुथ क्रमांक ७८ वर सर्वाधिक म्हणजे ६४.१२ टक्के मतदान झाल्याचे चित्र पहावयास मिळाले एकूण मतदान सर्वत्र शांततेत पार पडले असून येथे पोलीस प्रशासनाच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## प्रत्येक लोकसभा मतदार संघात सभा घेणारा पंतप्रधान पाहिला नाही-वडेट्टीवार

**नागपूर**-पंतप्रधान नरेंद्र मोदी एवढ्या सभा का घेत आहे याचे आश्चर्य वाटत आहे. भाजपच्या सर्वे किंवा आयबी इंटेलिजन्स सर्विसेसचा रिपोर्टमध्ये पराभव होणार असे आले असेल, म्हणून ते सभा घेत आहे. सत्तर वर्षात प्रत्येक लोकसभा मतदारसंघांमध्ये सहभाग घेणारे पंतप्रधान आम्ही पाहिलेच नाही, असा टोला विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी गुरूवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना हाणला.शरद पवारांनी सभेत मोदींचा व्हिडिओ दाखवला. त्यावर बोलताना फडणवीसांनी आम्ही पवारांचे जूने व्हिडिओ काढले तर त्यांनी किती कोलांटउड्या मारल्या हे कळेल असा इशारा दिला. पण, नुसता इशारा देऊन थांबू नये. तर फडणवीसांनी व्हिडिओ एकदा काढूनच टाकावे. दहा वर्षातील भाजपाचे आणि इकडचे व्हिडिओ काढा. म्हणजे दूध का दूध पानी का पानी होऊन जाऊ द्या.

## अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालयात

# इव्होल्वोस टेक्नॉलॉजी प्रा.लि पुणे यांच्यामार्फत नोकर भरती मेळावा संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**ओतूर । मयूर ढोबळे**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय ओतूर येथे पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांसाठी इव्होल्वोस टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड, पुणे मार्फत कॅम्पस रिक्रुटमेंट कार्यक्रम आयोजित केला होता. अशी माहिती रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रमेश शिरसाट यांनी दिली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्र अवघडे हे होते तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे इव्होल्वोस टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड, पुणे मधील प्रतिनिधी सौ.स्नेहल मोरे (एच .आर.) व सौ. अर्चना हजारे (रसायनशास्त्र विभाग ) उपस्थित होत्या.इव्होल्वोस टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड, पुणे मधील प्रतिनिधी सौ.स्नेहल मोरे व सौ.अर्चना हजारे यांनी



विद्यार्थ्यांची रिटर्न टेस्ट घेऊन विद्यार्थ्यांना कंपनी प्रेझेंटेशन दाखविले तसेच कंपनीमधील असणाऱ्या कामाची माहिती विद्यार्थ्यांना दिली व विद्यार्थ्यांच्या मनामधील असणाऱ्या शंकांचे समाधान करून त्यांच्यामधील उत्साह वाढविला. सदर रिक्रुटमेंट साठी आळे, जुन्नर, नारायणगाव, ओतूर महाविद्यालयातील पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागातील ४० मुले सहभागी झाली होती.सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण होण्यासाठी डॉ. जयसिंग गाडेकर, प्रा.समीर शेख, प्रा.संतोष काळे, आय. क्यू.ए.सी.कॉर्डिनेटर डॉ. योगेश्वर काळदंते, प्रा.रोहिदास मेमाणे, प्रा.स्वप्नाली दांगट, प्रा.रत्नमाला मोरे व शिक्षकेतर कर्मचारी श्री.निखिल काकडे, श्री अमोल बारगळ, श्री. किरण ढोमसे व श्रीमती शेख टी.न.यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे प्रास्तविक डॉ. रमेश शिरसाट व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सुवर्णा डुंबरे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार डॉ. एकनाथ कबाडी यांनी केले.

# आष्टीत त्रिदल आजी माजी सैनिक संघटनेच्यावतीने सैनिक मेळाव्याचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

आष्टी,पाटोदा,शिरूर तालुक्यातील सर्व सैनिक बांधवांच्या अडीअडचणी तसेच समस्या जाणून घेण्यासाठी आष्टी शहरातील मोरेश्वर मंगल कार्यालय येथे शनिवार दि. २७ एप्रिल रोजी सकाळी ११ वा. सैनिक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून या मेळाव्यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बीड, लातूर,धाराशिव मतदार संघाचे आ. सुरेश धस यांचे मार्गदर्शन करणार आहेत. तरी या सैनिक मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आष्टी तालुका त्रिदल आजी माजी सैनिक संघटना यांच्या वतीने करण्यात आले आहे.

आष्टी, पाटोदा, शिरूर तालुक्यातील सर्व आजी-माजी सैनिक व त्यांचे कुटुंब यांना येणाऱ्या अडचणी त्याचबरोबर आपले सैनिक बांधव आजही सीमेवर काम करत आहेत. देशाच्या सीमेवर सैनिक आहेत म्हणूनच आपण सर्व आपल्या घरात निवांत झोपतोय. सैनिकाच्या होणाऱ्या अन्यायासाठी त्रिदल आजी माजी संघटना अविरत झटत सैनिक व सैनिक परिवारावर होणारे अत्याचार व अन्याय दूर करण्यासाठी तसेच सैनिकांच्या समस्यांचे,अडचणींचे पुर्णपणे निरसण करण्याचे काम ही संघटना एकदम प्रभावीपणे करत असून याच पार्श्वभूमीवर सैनिक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या या मेळाव्यास प्रमुख मार्गदर्शक म्हणून आमदार सुरेश धस हे असणारा आहेत तर या सैनिक मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आष्टी तालुका त्रिदल आजी माजी संघटना यांनी केले आहे.



**कै. नर्मदाबाई भीमराव पाटील दळवी दिनांक २४.०४.२०२४ या रोजी दुःखद निधन झाले दिनांक २६.०४.२०२४ या रोजी रक्षाविसर्जनाचा कार्यक्रम होता रक्षा पाण्यामध्ये विसर्जित न करता आपल्या शेतामध्ये खड्डा खोदून आंब्याचे झाड लावून रक्षा विसर्जित केलेला आहे हा दळवी परिवाराचा चांगला उपक्रम आहे याचा आदर्श सर्वांनी घ्यावा... छाया लोकनेता न्यूज नेटवर्क**

## चारोळी

नभ दाटूनी येता
शब्द फुलूनी येतात
नभ बरसुनी जाता
शब्द सर बनूनी वाहतात.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# ति संवेदनशील मतदान केंद्रावर सीसीटिव्ही बसवा; तेथे जादा पोलिस बंदोबस्त ठेवा

## फुलचंद कराड यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ पोलिस अधीक्षकांना भेटले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

बीड लोकसभा मतदार संघासाठी येत्या १३ मे रोजी मतदान होणार आहे. मतदान प्रक्रिया शांततेत आणि निर्भय वातावरणात व्हावी, कुठलाही अनुचित प्रकार होऊ नये, तसे अति संवेदनशील मतदान केंद्रांवरील बोगस होणारे मतदानाचे गैरप्रकार रोखावे यासाठी त्या केंद्रावर सीसीटिव्ही कॅमेरे बसवण्यात यावेत, तसेच तेथे जादा पोलिस बंदोबस्त तैनात करावा अशी मागणी बीड जिल्हा पोलिस अधीक्षक यांना करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे शिष्टमंडळ गुरुवार, दि.२५ एप्रिल रोजी जिल्हा पोलिस अधीक्षक यांना भेटले आहे.


राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा भगवान सेनेचे सरसेनापती फुलचंद कराड, ज्येष्ठ नेत्या सौ.सुदामतीताई गुट्टे यांच्या नेतृत्वाखाली भेटलेल्या शिष्टमंडळात जमील अध्यक्ष, भागवतराव मुंडे, भागवत गित्ते, बंडू भाऊ जटाळ, अशोक तांदळे, बालाजी इंगोले, डावकर यांच्यासह अनेकांचा समावेश होता. जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, परळी विधानसभा मतदार संघात



अनेक संवेदनशिल मतदान केंद्र आहेत. या मतदान केंद्रावर मतदारांना दडपशाही केली जाते. त्यांच्या हाताला फक्त शाही लाऊन बाहेरच्या बाहेरून परत पाठवले जाते आणि मतदान केंद्राच्या आत काही व्यक्ती मशीनचे बटण दाबत असतात. हे असले प्रकार होऊ नयेत यासाठी प्रशासनाने या संवेदनशील मतदान केंद्रावर सीसीटिव्ही यंत्रणा बसवावी व त्या ठिकाणी मतदारांना निर्भयपणे मतदान करता यावे यासाठी पोलिस बंदोबस्त जादा प्रमाणात तैनात करावा अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे. अति संवेदनशील म्हणून गणल्या जाणाऱ्या परळी मतदार संघातील मतदान केंद्रांची यादीही यावेळी प्रशासनाला देण्यात आली असून, संपूर्ण जिल्ह्यातील संवेदनशील मतदान केंद्रांचीही यादी प्रशासनाला दिली जाणार असल्याचे फुलचंद कराड यांनी सांगितले आहे.

संपादकीय

# मतमतांचे भोवरे



देशासमोरील ज्वलंत प्रश्नांऐवजी भावनिक मुद्द्यांना हात घालून मतदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न ध्रुवीकरणाच्या दिशेने नेणारा आहे.

सर्वसामान्य लोकांच्या ज्वलंत प्रश्नांवर आणि देशापुढील, विविध राज्यांपुढील समस्यांवर मंथन होऊन लोकसभा निवडणुकीत काही महत्त्वाचे प्रश्न ऐरणीवर येतील, ही अपेक्षा पुन्हा फोल ठरताना दिसत आहे. खरे तर देशाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची अशी निवडणूक असतानाही प्रचारातील चर्चेची गाडी भावनिकता, अस्मिताबाजी, ध्रुवीकरण यांच्याच मार्गाने चाललेली असून ती योग्य मार्गावर आणण्यासाठी कोणाला साकडे घालावे, असा प्रश्न आहे.याचे कारण वरिष्ठ नेतेमंडळीच या धुळवडीत भाग घेत आहेत. त्यात पंतप्रधान पदावरील नरेंद्र मोदी हेही सहभागी आहेत. अशावेळी प्रचाराचा स्तर खालावला नाही तरच नवल. दीर्घकाळ प्रस्थापित असलेल्या काँग्रेसला सत्तेवरून दूर करून आपले बस्तान बसवणे ही अर्थातच सोपी गोष्ट नव्हती, त्यामुळे २०१४च्या निवडणुकीतील आक्रमक आणि भडक प्रचाराची रणनीती काही प्रमाणात समजून घेता येते.पण दहा वर्षे सत्ता उपभोगल्यानंतरही जर तेच युक्तिवाद आणि तोच आरोप-प्रत्यारोपांचा खेळ खेळला जात असेल तर गेल्या दहा वर्षांत या लोकशाही देशाने प्रगती केली म्हणजे नेमके काय केले, असा प्रश्न पडतो. मोदींच्या भाषणांमधून मासे आणि मटणावरून शेरेबाजी झाली, काँग्रेसवर मुस्लिमधार्जिणेपणाच्या आरोपाचा पाढा वाचून झाला. हे कमी म्हणूनच की, काय मंगळसूत्राचीही उठाठेव केली गेली.धार्मिक ध्रुवीकरणाशिवाय निवडणुका लढवता येत नाहीत आणि देशाचे शीर्षस्थ नेतृत्व दरवेळी त्याचाच आधार घेते, हे दुर्दैवी वास्तव आहे. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या काळातील भ्रष्टाचारविरोधी असंतोषावर स्वार होऊन मोदींच्या नेतृत्वाखालील सरकार २०१४ मध्ये सत्तेवर आले.शंभर दिवसांत कायापालट घडवण्याची ग्वाही देणारे मोदी दहा वर्षांनंतरही पुन्हा संधी मागत आहेत आणि ती मागताना आपल्या कामगिरीचा दाखला देण्याऐवजी धार्मिक ध्रुवीकरणाचा आधार घेत आहेत. निवडणूक हा अलीकडच्या काळात जात आणि धर्माचा खेळ बनला आहे. उमेदवारी वाटपापासून जात आणि धर्म सर्वच पक्षांच्या केंद्रस्थानी असतात, हे वास्तव आहे. ते बदलण्याचा कोणीही गांभीर्याने आणि प्रामाणिकपणे प्रयत्न करताना दिसत नाही.बिहारचे माजी उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनी चैत्री नवरात्राच्या पहिल्या दिवशी मासे खात असतानाचा व्हिडिओ टाकला. त्याची अपेक्षेप्रमाणे प्रतिक्रिया आल्यावर, ''भाजपच्या बुद्ध्यांकाची चाचणी करण्यासाठी आपण हा व्हिडिओ टाकला'', असे त्यांनी सांगितले.या व्हिडिओवर बिहार भाजपच्या स्थानिक नेत्यांच्या प्रतिक्रिया आल्या; परंतु मोदी यांनीही, श्रावणात मटण खाता, नवरात्रात मासे खाता, लोकांच्या भावनांशी खेळता, ही 'मुगलिया सोच'असल्याची टीका केली. लोकांच्या खाण्यापिण्यावर निर्बंध आणण्याचे भाजपचे प्रयत्न असल्याची टीका त्यावर विरोधकांनी केली.मासे आणि मटणाचा हा विषय मागे पडतानाच राजस्थानातील बांसवाडा येथील सभेत नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसच्या जाहीरनाम्यातील संपत्तीच्या फेरवाटपाच्या मुद्याचा आधार घेऊन, केंद्रात काँग्रेसची सत्ता आली तर जास्त मुले असलेल्या 'घुसखोरां'ना संपत्तीचे फेरवाटप होईल; तसेच तुमच्याकडील सोने,दागदागिने काढून घेताना मंगळसूत्रेही हिरावून घेतली जातील, असे विधान केले.निवडणुकीच्या मैदानात उतरल्यावर कसलाही विधिनिषेध ठेवायचा नाही, असा या नेत्यांनी पण केला आहे की काय, असे वाटते. डॉ. मनमोहन सिंग यांच्या २००६मधील, म्हणजे अठरा वर्षांपूर्वीच्या भाषणातील विधानांचा मोडकातोडका संदर्भ घेऊन मोदींनी आपला अजेंडा रेटण्याचा प्रयत्न केला. इथे केवळ त्यांनी धार्मिक ध्रुवीकरणाचाच प्रयत्न केलेला नाही, तर महिलांच्या मनात भीतीही पेरण्याचा प्रयत्न केला.काँग्रेसने त्याबाबत निवडणूक आयोगाकडे तक्रार केली असली तरी त्यावर काहीही होणार नाही, याची सर्व संबंधितांना खात्री आहे. मंगळसूत्र हिरावून घेण्याच्या विधानावर काँग्रेसनेत्या प्रियांका गांधी यांनी ''देश युद्धाला सामोरा जात असताना इंदिरा गांधींनी त्यांचे मंगळसूत्र आणि दागिने दान केले होते. माझ्या आईने तिचे मंगळसूत्र या देशासाठी गमावले,'' असे उत्तर दिले.हे होत असतानाच काँग्रेसच्या थिंक टँकमधील नेते सॅम पित्रोदा यांनी भाजपच्या हाती नवेच कोलित दिले आहे. संपत्तीच्या वाटपासंदर्भात अमेरिकेतला दाखला देऊन त्यांनी काँग्रेसला अडचणीत आणले. अर्थात, काँग्रेसने याविषयी सारवासारवही केली. सत्य-असत्याचे मिश्रण, कल्पनाविस्तार, विपर्यास अशा विविध आयुधांचा वापर करून 'नरेटिव' तयार करण्यात मोदी हे किती मातब्बर आहेत, हे एव्हाना सगळ्यांना कळून चुकले आहे. संपत्तीच्या पुनर्वितरणाचा मुद्दा त्यामुळेच त्यांनी थेट मंगळसूत्रापर्यंत नेऊन भिडवला. एकूणच चर्चेची भरकटलेली गाडी पुन्हा रूळावर येणार का, हा प्रश्नच आहे.

# ओडिसी

**लोकनेता न्युज नेटवर्क**

शास्त्रीय नृत्यातील आणखी एक अत्यंत पौराणिक नृत्यशैली म्हणजे ' ओडिसी '.ही नृत्यशैली मूळची,ओरीसाची असल्याने तिचे नाव ओडिसी असे पडले.यातील नृत्य,नृत्याची शैली अत्यंत कमनीय व लालित्यपूर्ण असते.यामध्ये भक्ती आणि शृंगार रसांना प्राधान्य आहे.महेश्वर महापात्रा यांनी लिहिलेला 'अभिनयचंद्रिका ' हा ग्रंथ या नृत्यशैलीचा प्रमुख ग्रंथ आहे.

महारी नामक देवदासींनी आणि गोटीपुत्रांनी (मुलीचा वेश करून देवळात नृत्य करणाऱ्या तरुणांनी) या नृत्याचा प्रसार केला.यानुसार या नृत्यात दोन नर्तनशैली अस्तित्वात आल्या.या शैलीच्या पुनरुज्जीवनासाठी अनेक कलाकारांना खूप संघर्ष करावा लागला.या शैलीच्या पुनरुज्जीवनाच्या कार्यात गुरू केलुचरण महापात्रा यांचा खूप मोठा वाटा आहे.या नृत्यामध्ये भंग, त्रिभंग, व अतिभंग या तीन प्रकारच्या स्थिती असतात.नृत्य सादरीकरणाच्यावेळी मंगलाचरण, बटू,पल्लवी, अष्टपदी, मोक्षनाट्य या रचनांचे सादरीकरण केले जात असून,इतर नृत्यशैलीच्या तुलनेत ओडिसी नृत्यामध्ये अष्टपदीला अधिक महत्त्व आहे.ही अष्टपदी श्री जयदेव यांची असून यामध्ये नायिका भेदांवर आधारित भावाभिव्यक्ती केली जाते.तसेच दशावतारी कथा,राधा - कृष्ण लीला या नृत्यास विशेष करून प्रस्तुत केल्या जातात.

संगीत : या नृत्यशैलीसाठी हिंदुस्थानी व दाक्षिणात्य या दोन्ही संगीताचा उपयोग होतो.यासाठी पखवाज , विणा,बासरी,सारंगी आदी वाद्ये वापरतात.

**नृत्ययात्रा**


भाषा : यातील पदे ही उडिया किंवा संस्कृत भाषेत असतात.ही नृत्यशैली देखील पूर्व धार्मिक पार्श्वभूमी असणारी आहे. कोणार्कचे सूर्यमंदिर , जगन्नाथपुरी,भुवनेश्वर मंदिराच्या भिंतीवर या नृत्य शैलीच्या शिल्पाकृती असून ही नृत्यशैली इथे सजीव साकार झाल्याचा भास निर्माण होतो.अलीकडच्या काळात श्रीमती झेलम परांजपे यांनी या नृत्यशैलीच्या प्रसारासाठी खूप कष्ट घेतले आहेत.वेशभूषा : महाराष्ट्रीय नऊवारी साडीप्रमाने साडी नेसलेली असते.तिला ' शट साडी ' म्हणतात.त्याचबरोबर कुंचुल म्हणजे चोळी, निबिबंध म्हणजे कंबरेला गुंडाळण्याचे वस्त्र,जोभा म्हणजे कमरपट्टा अशी एकूण पारंपरिक पद्धतीची वेशभूषा असते.तसेच सर्व दागिने चांदीचे किंवा चांदीचे पाणी दिलेले असतात.अंबाड्यावर मुकुटाप्रमाने घातलेली वेणी आणि अतिशय सुंदर असा कमरपट्टा यामुळे ओडिसाची वेशभूषा पटकन भावते.अशा प्रकारे आपण आज ओडिसी नृत्य प्रकाराबद्दल माहिती घेतली .भेटूया पुढील भागात.

**- डॉ .रेणू जोशी**
**(अभिनेत्री, नृत्यदिग्दर्शिका, लेखिका)**



# रुपयाची 'चलन'कथा

भारताच्या उल्लेखनीय विकास दरासह निर्यातवाढीला चालना देण्याचे प्रयत्न यामुळे रुपया जागतिक चलन क्षेत्रात तुल्यबळ प्रतिस्पर्धी म्हणून उदयास येण्याची शक्यता आहे. रिझर्व्ह बँक आणि केंद्र सरकार यांच्यातील समन्वय त्यासाठी आवश्यक आहे.स्वातंत्र्यप्राप्तीनंतर, १६ एप्रिल २०२४ रोजी आपल्या भारतीय रुपयाची लक्षणीय घसरण झाली. अमेरिकी डॉलरच्या (यूएसडी) तुलनेत रुपयाने ८३.५०चा ऐतिहासिक नीचांक गाठला. नंतर तो थोडा सुधारला. बुधवारी(ता.२४) हा दर ८३.२४ होता. रुपया यापूर्वी १३ नोव्हेंबर २०२३ रोजी ८३.३९च्या सार्वकालिक नीचांकी पातळीवर पोहोचला होता.जानेवारी २०२२ पासून डॉलरच्या तुलनेत रुपयाच्या मूल्यात सातत्याने घसरण होत असल्याबद्दल धोरणकर्त्यांनी चिंता व्यक्त केली आहे. रुपयाला जगातील सर्वोच्च १५ सर्वात मौल्यवान चलनांमध्ये स्थान मिळूनही, गेली दोन वर्षे रुपया आणि डॉलर यांच्यातील विनिमयदरात विलक्षण अस्थिरता दिसून आली आहे.डॉलरच्या तुलनेत रुपयाच्या घसरणीचे आपल्या अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होतील? डॉलरच्या तुलनेत रुपया बळकट व्हावा यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने कोणते उपाय योजले आहेत? हे प्रश्न आणि या समस्या महत्त्वपूर्ण आहेत. त्यांचे निराकरण होणे आवश्यक आहे.



१९४५ मध्ये स्थिर विनिमय दर प्रणालीवर देखरेख ठेवण्याच्या उद्देशाने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची (आयएमएफ) स्थापना करण्यात आली. बाजारातील मागणी आणि रुपयाच्या पुरवठ्यानुसार ठरलेल्या लवचिक विनिमय दरात संक्रमण होण्यापूर्वी भारताने १९४५ ते १९७३ या काळात या प्रणालीचे पालन केले. पण नाणेनिधीची प्रस्तावित यंत्रणा कुचकामी असल्याचे आढळून आले. अनेक सदस्यदेशांनी त्यांच्या चलनांचे डॉलरविरुद्ध सत्तरच्या दशकाच्या सुरुवातीस अवमूल्यन सुरु केले.१९४८ ते १९६६ दरम्यान रुपया डॉलरच्या तुलनेत ४.७९ इतका होता. १९६०च्या दशकात देशातील अन्न आणि औद्योगिक उत्पादनात घट झाल्याने तसेच चीन आणि पाकिस्तानबरोबरच्या युद्धांमुळे आर्थिक ताण वाढला. परिणामी, आर्थिक व्यवहारांचे संतुलन बिघडले. रुपयाचे तीव्र अवमूल्यन झाले. १९६६ मध्ये त्याचे मूल्य डॉलरच्या तुलनेत चार रुपयांवरून १९७३ मध्ये सुमारे ७.६ रुपयांपर्यंत घसरले.भारतीय अर्थव्यवस्थेच्या इतिहासात, निर्यात वाढवण्यासाठी ६ जून १९६६ रोजी रुपयाचे प्रथमच ५७% अवमूल्यन करण्यात आले. तेलाच्या संकटाचा रुपयाच्या मूल्यावरही विपरित परिणाम झाला. १९६० आणि १९७०च्या दशकात डॉलरच्या तुलनेत आणखी अवमूल्यन झाले. ऐंशीच्या दशकात रुपयास चढ-उतारांना सामोरे जावे लागले. जानेवारी १९८१ मध्ये रुपयाची डॉलरच्या तुलनेत ८.०६ ते डिसेंबर १९८९ मध्ये १६.८४ पर्यंत घसरण झाली.जून १९९१ मध्ये, भारतासमोर आयात-निर्यात व्यापारातील तुटीचे गंभीर संकट उभे राहिले. त्यामुळे रुपयाचे डॉलरच्या तुलनेत आणखी अवमूल्यन होऊन ते २१.२० एवढे झाले. १९९३ हे वर्ष भारतीय चलन इतिहासातील महत्त्वपूर्ण वळणाचे साक्षीदार होते. यावेळी, बाजाराच्या गरजांनुसार चलनास मुक्तपणे विहार करू दिला गेला. १९७३पासून, भारताने लवचिक विनिमय दर प्रणाली स्वीकारली.इतर चलनांच्या तुलनेत रुपयाचा विनिमयदर प्रामुख्याने मागणी आणि पुरवठा या बाजार शक्तींद्वारे निर्धारित केला जातो. रिझर्व्ह बँकेकडे रुपयाचे मूल्य ठरवण्याचा मर्यादित अधिकार आहे. १९९१पासून सातत्याने घसरण झाल्यानंतर जून १९९३ पर्यंत रुपयाचे मूल्य ३१.३७ पर्यंत पोहोचले. निर्यातीला चालना देण्यासाठी आणि भारतात थेट परकी गुंतवणूक वाढवण्यासाठी या कालावधीत अनेकविध अवमूल्यने जाणीवपूर्वक करण्यात आली. नव्वदच्या दशकात, रुपयाचे मूल्य अमेरिकी डॉलरच्या तुलनेत अंदाजे २२.५० रुपयांनी घसरले.

आंतरराष्ट्रीय घटक

त्यानंतरच्या दशकभरात (सन २०००-२०१०) रुपयामध्ये डॉलरच्या तुलनेत ४० ते ५१च्या मर्यादेत चढ-उतार झाले, आणि त्याचे मूल्य प्रामुख्याने ४५च्या आसपास होते. २००८च्या जागतिक आर्थिक संकटामुळे रुपयाच्या मूल्यात थोडीशी वाढ झाली. तथापि, २०१२ नंतर, रुपयाचे मूल्य एका डॉलरच्या तुलनेत ५३ रुपयांहून अधिक कधीच झाले नाही.असे दिसून येते, की गेल्या ७७ वर्षांमध्ये, रुपयाचे मूल्य मोठ्या प्रमाणात घसरले आहे. ते डॉलरच्या तुलनेत सुमारे ७९-८४ रुपयांपर्यंत पोहोचले आहे. अगदी ताजा म्हणजे बुधवारचा आकडा एक डॉलरला ८३.५० रु. असा आहे.डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपयाची घसरण विविध जागतिक आणि देशांतर्गत घटकांमुळे होऊ शकते. आंतरराष्ट्रीय तणाव, उदा. रशिया-युक्रेन संघर्ष, कच्च्या तेलाच्या किमतीतील वाढीमुळे रुपयावर दबाव वाढला आहे. याव्यतिरिक्त, जागतिक आर्थिक परिस्थितीतील कडक नियम-अटींमुळेही हा दबाव वाढीस लागला. तेल आयातदारांकडून डॉलरची वाढलेली मागणी आणि व्यापारातील तूट या समस्यांमुळे रुपयाच्या घसरणीला हातभार लागला.शिवाय, अमेरिकी फेडरल रिझर्व्हच्या व्याजदरवाढीविषयी निर्णयाच्या अनिश्चिततेचाही बाजारावर परिणाम झाला. चलनविषयक धोरण बळकट करून महागाई रोखण्यासाठी व भविष्यातील संकटाला तोंड देण्यासाठी रिझर्व्ह बँकेने केलेल्या उपाययोजनांनी रुपयाच्या अवमूल्यनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

कच्च्या तेलाच्या उच्च किंमती, शेअर बाजारातील घसरण आणि चलनविषयक धोरणातील फेरबदल यांच्यामुळे डॉलरच्या प्रवाहावर नकारात्मक परिणाम झाला आणि आता परकी चलन बाजारात रुपया आणखी कमकुवत झाला आहे.अलीकडच्या काळात भारताच्या उल्लेखनीय विकास दरासह परदेशातील खर्चात लक्षणीय वाढ आणि निर्यातवाढीचे प्रयत्न यांमुळे रुपया जागतिक चलन क्षेत्रात तुल्यबळ प्रतिस्पर्धी म्हणून उदयास येण्याची शक्यता आहे. रिझर्व्ह बँक आणि केंद्र सरकार यांच्यातील सहकार्य त्यासाठी आवश्यक आहे.असा अंदाज आहे की, अर्थव्यवस्थेतील रुपयाचा पुरवठा कमी करण्यासाठी रिझर्व्ह बँक रेपो दरात वाढ करेल आणि नजीकच्या भविष्यात डॉलरचा पुरवठा वाढवण्यासाठी आंतरराष्ट्रीय बाजारात काही परकी चलनसाठ्याची विक्रीही करू शकेल.गुंतवणुकीला अनुकूल वातावरण तयार करण्यासाठी रिझर्व्ह बँकेला विवेकपूर्ण आर्थिक धोरणे कायम ठेवण्याची गरज आहे. आर्थिक पायाभूत सुविधा मजबूत करणे आणि उत्पादनाला, नवनिर्मितीला चालना देण्यासाठी व स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी उपक्रम राबवणे आवश्यक आहे. यामुळे निर्यातवाढीला चालना मिळेल आणि रुपयाला जागतिक स्तरावर विश्वासार्ह चलन म्हणून उदयास आणणे शक्य होईल.

# गेलें तें भूस जावो परतें...

तुकोबांचा अभंगगाथा म्हणजे तुकोबांच्या मनाचा आरसाच जणू. 'तुकोबा'नामक विलक्षण तरल मनाच्या अगदी अंत:स्तरावरदेखील उमटणाऱ्या सूक्ष्मातिसूक्ष्म विचारलहरींची प्रतिबिंबे आपल्याला त्यांच्या अभंगांत उमटलेली दिसतात.

त्यांच्या गाथेमधील 'नाट' या अभंगप्रकारातील एका अभंगात तुकोबा काळाला धन्यवाद देताना दिसतात. ''इथवर मी जगलो हे बरे झाले. शरीर आधीच पडले असते तर काहीच भक्तिसाधन हातून घडले नसते. आजवरचे दिवस अन्य गोष्टींमध्येच बव्हंशी व्यतीत झाले.

त्यांबद्दल खंत करत बसणे आता नको. हाताशी असलेले उर्वरित आयुष्य मात्र परमार्थसाधनातच वेचायचे...'', असे तुकोबारायांच्या मनात उमटलेले विचारतरंग अभंगात अक्षरांकित झालेले आहेत.

गतकालीन घटितांबद्दल वर्तमानात हळहळत बसण्यापेक्षा तो सारा गतकाल झटकून टाकत, मनाशी योजलेल्या ईप्सिताच्या परिपूर्तीसाठी सरसावायचे हा तुकोबांच्या व्यक्तित्वाचा पीळ अभंगाच्या दुसऱ्या चरणातील, 'गेलें तें भूस जावो परतें', या ओळींत रसरशीतपणे अवतरलेला आहे.

तुकोबा इथे दाखला देतात, तो शेतावरील खळ्यावर चालणाऱ्या उफणणीचा. कणसे मळून वेगळ्या केलेल्या जोंधळ्यातील भूस काढून टाकण्यासाठी दाणे उफणले की निरुपयोगी भूस वाऱ्याबरोबर वाहून जाते.

त्याच न्यायाने, भूतकालीन घटनांचे निरुपयोगी व क्षुल्लक भुसकट मागेच सोडून, भविष्यात जे साध्य करायचे आहे, त्याच्या परिपूर्तीसाठी झटणे, हे तुकोबांच्या दाखल्यानुसार, सुज्ञपणाचे लक्षण होय. भूतकाळाकडे बघण्याची तुकोबाप्रणीत तीच जीवनदृष्टी आधुनिक अर्थशास्त्रामध्ये, 'लेट बायगॉन्स बी बायगॉन्स...', अशा शब्दसंहितेद्वारे



निर्देशित केली जाते. एखादा होतकरू नवउद्योजक मोठ्या उमेदीने नवीन व्यवसाय सुरू करतो.

उद्योग सुरू झाल्यानंतर अवघ्या वर्षा-दोन वर्षांतच, काही कारणाने त्या व्यवसायक्षेत्राचे दिवस फिरतात. हेही दिवस जातील, उद्योगामध्ये व्यवसायाचे चक्र खाली-वर तर होतच राहणार...अशी मनाची समजूत घालत तो होतकरू व्यवसाय रेटतच राहतो.

एक वेळ अशी येते की, या व्यवसायक्षेत्रातून आता बाहेर पडणेच इष्ट, अशी लक्षणे स्पष्ट दिसू लागतात. तरीदेखील, ''अरे, एवढी गुंतवणूक या व्यवसायात केली, यंत्रसामग्री घेतली ...एवढ्या सगळ्यांवर पाणी कसे सोडायचे'', या विचाराने, तोच उद्योग तगवण्याच्या हट्टी प्रयत्नांपायी तोट्याच्या गर्तेत अधिकाधिक रुतत जाणाऱ्या त्या उद्योजकाला अखेर एक दिवस,

'लेट बायगॉन्स बी बायगॉन्स...', या भूमिकेवर यावेच लागते. आजवर जे झाले ते झाले, आता याउपरही आपण दिशा बदलली नाही, तर वर्तमानाबरोबरच आपले भविष्यही धोक्यात येईल, तेव्हा भविष्यकालीन वाटचालीसाठी दिशा बदलण्यातच आपले हित सामावलेले आहे,

हे उमगलेला व्यावसायिक भूतकाळाचे भूस उफणून टाकत नव्या दिशेला प्रारंभ करतो. गतकाळातील घटनांकडे, इतिहासाकडे बघण्याच्या या तारतम्यपूर्ण नजरेलाच 'प्रगल्भ इतिहासदृष्टी' असे संबोधतात. खामगाव येथे तारीख २७ डिसेंबर १९१७ रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'अखिल मराठा शिक्षण परिषदे'च्या ११व्या अधिवेशनादरम्यान केलेल्या अध्यक्षीय भाषणातील एक मुद्दा, करवीराधिपती छत्रपती शाहूमहाराजांच्या ठायी तशी प्रगल्भ, परिपक्व इतिहासदृष्टी कशी परिणत झालेली होती, याची पुरेपूर साक्ष पुरवितो.

स्वराज्यसंपादनाचे लाभ संपूर्णतया पदरात पाडून घेण्यासाठी प्रथम आपल्याला सामाजिक ऐक्यासाठी कसोशीने प्रयत्नशील बनावे लागेल आणि त्यासाठी गतकालातील अनिष्ट व कटू कथितांचे भूस वाऱ्याबरोबर लोटून द्यावे लागेल, ही बाब महाराजांनी त्यांच्या अध्यक्षीय विचारविमर्शादरम्यान पोटतिडकीने मांडलेली दिसते.

''...जरुरीची गोष्ट ही की, जातिपद्धतीच्या शृंखला तोडून टाकण्याचे ध्येय साध्य करण्याकरिता आणि परस्परांची मने एक करणे असेल तर परशुरामास रामाने जिंकले तो राम क्षत्रिय होता आणि परशुराम हा ब्राह्मण होता,

असल्या प्रकारच्या गतकालीन ऐतिहासिक गोष्टी आम्ही साफ विसरल्या पाहिजेत. असल्या गोष्टींची आठवण आम्ही सदोदित ठेवू लागलो, तर राम आणि परशुराम यांच्यासारखीच भांडणे आमच्यामध्ये चालू रहातील, अशी मला खात्री आहे'', हे शाहूमहाराजांचे प्रतिपादन म्हणजे

, 'गेलें तें भूस जावो परतें', या तुकोक्तीचा गाभा आणि आधुनिक अर्थशास्त्रीय व्यावसायिक तत्त्वाचा सारांश, त्यांना किती अचूकपणे आकळला होता, याचा सोळा कसी दाखला होय. ओंजळीत काय जपायचे आणि कोणते भूस उफणून टाकायचे याचे तारतम्य पूर्णपणे हरपण्यातच आपल्या आजच्या बहुतेक समस्यांची पाळेमुळे घट्ट रुजलेली आहेत!

## आदर्श लोकप्रतिनिधी, खासदार आपण दिल्लीला पाठवायचा आहे

# डॉ.सुजय विखे पाटील यांचे माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांच्याकडून कौतुक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहमदनगर । प्रतिनिधी**

मागील पाच वर्षात लोकसभा मतदार संघाता चेहरा मोहरा बदण्याचा प्रयत्न खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी केला. केंद्र सरकारच्या विविध योजनांचा लाभ सामान्य मानसापर्यंत पोहचविण्यासाठी केलेले यशस्वी प्रयत्न खुप महत्वपुर्ण ठरल्याचे गौरवोद्गार माजी मंत्र तथा जिल्हा बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डीले यांनी काढले.

महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी आपल्या निवडणुक प्रचारार्थ बाबळे वाडी, वरशिंदे, ताहाराबाद, गाढकवाडी, म्हैसगाव, कोळेवाडी, शेरीचिखलठाण, दरडगावथडी या गावांमध्ये मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या निवडणुकीतील आपली भूमिका स्पष्ट केली. केंद्र सरकारने मागील १० वर्षात घेतलेल्या निर्णयांची माहिती देऊन, यावेळेस पुन्हा नरेंद्र मादी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांना विजयी करण्याचे आवाहन महायुतीच्या नेत्यांनी केले आहे.

लोकसभेचे खासदार डॉ. डॉ. सुजय विखे पाटील यांनी गेल्या पाच वर्षांत केलेल्या विकासकामांच्या जोरावर नगरकरांच्या मनात आपली प्रतिमा निर्माण केली आहे. त्यांना जिल्ह्याच्या प्रश्नांची जाण आहे. जिल्ह्यातील





तरुणांच्या रोजगारासाठी नगर तालूका तसेच श्रिगोंदा येथे औद्योगिक वसाहत निर्माण करण्यासाठी जाग उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी यशस्वी प्रयत्न केले आहेत. यामुळे येणाऱ्या उद्योगांमुळे रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होतील असा विश्वास माजी मंत्री कर्डिले यांनी व्यक्त केला.

अहिल्यानगर मतदारसंघांतील जनतेने खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांना पाठबळ देण्याचा निर्णय घेतला आहे. डॉ. विखे पाटील यांच्या विजयामुळे पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांचा पंतप्रधान होण्याचा मार्ग अधिक बळकट होईल असा विश्वास व्यक्त करून या विभागाच्या विकासासाठी पुन्हा एकदा महायुतीला आवाहन माजी मंत्री कर्डिले यांनी केले. देशाचे यशस्वी पंतप्रधान मा.श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली काम करताना गेल्या ५ वर्षात मोठ्या प्रमाणात विकासकामे केली. या ५ वर्षात लोकांनी दाखवलेला विश्वास सार्थ ठरवण्याचा प्रयत्न केला आणि गेल्या ५ वर्षांचे प्रगतीपुस्तक आज जनतेसमोर ठेवण्याचे काम करतोय, असे यावेळी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले. तसेच आता लोकांनी ठरवायचे आहे, की भविष्यात आणखी कशा पद्धतीने विकास हवा आहे, असे आवाहन केले.यावेळी उपस्थित नागरिकांसमोर गेल्या ५ वर्षात लोकसभेत केलेल्या कामांचे जनतेसमोर सादरीकरण करत कामांची सखोल माहितीही डॉ. विखे यांनी दिली. जिल्ह्यात सर्वाधिक विकास कामे महायुतीच्या काळात झाल्याचे त्यांनी सांगितले. त्याच बरोबर पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्याला सर्वाधिक निधी मिळाल्याचा उल्लेख त्यांनी केला.येणाऱ्या काळात जिल्ह्यातील तरूणांना कामासाठी बाहेर जावे लागणार नाही यासाठी आपले विशेष प्रयत्न असतील. त्यासाठी तीन एमआयडीसीची कामे तयार असून लवकरत त्या सुरू केल्या जातील. त्याचबरोबर शेतकऱ्यासाठी बीयाण्यापासून बाजारपेढापर्यंत सेवा सुविधा निर्माण करण्यासा मानस त्यांनी यावेळी बोलून दाखविला. पंतप्रधान मोदींच्या हमीच्या जोरावर जिल्हा सुभलाम सुफलाम करणार असे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

## उद्धव ठाकरेंसारखा रंग बदलणारा सरडा आपण पाहिला नाही:व्हिडिओ दाखवत एकनाथ शिंदेंचा हल्लाबोल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची स्तुती करणारे उद्धव ठाकरे आता त्यांच्यावर टीका करत आहेत, याचा मोबाईलवरील व्हिडिओ उपस्थितींना माईकवरून ऐकवत मुख्यमंत्री शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यासारखा फास्ट रंग बदलणारा सरडा आपण पाहिला नाही, असे म्हणत जोरदार टोला हाणला. संदीपान भुमरे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी ते छत्रपती संभाजीनगर शहरात आले होते. यावेळी गुलमंडी येथे झालेल्या सभेत त्यांनी उद्धव ठाकरे व आदित्य ठाकरेंवर हल्लाबोल केला.

शिंदे म्हणाले की, छत्रपती संभाजीनगरातील जनतेने शिवसेना, धनुष्यबाण आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंच्या विचारावर प्रेम केले. गेल्यावेळी थोडी गडबड झाली, या वेळी दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ होणार नाही. धनुष्यबाणच निवडून येणार, ४०० पारमध्ये संदीपान भुमरे मामा पाहिजेतच. असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.रॅलीनंतर गुलमंडी येथे झालेल्या




सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांच्यावर टीका केली. 'नो खैरे ओनली भुमरे.. एकच मामा भुमरे मामा' या घोषणांचा उल्लेख करत जालन्यात रावसाहेब दानवे आणि संभाजीनगरातून भुमरे लोकसभेत निवडून गेले पाहिजे, असे आवाहन देखील त्यांनी केले.मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले की, रोटी, कपडा, मकान देणारे आपले पंतप्रधान आहेत. भ्रष्टाचाराचा एकही शिंतोडा त्यांच्यावर नाही, ते बेदाग आहेत. बाप एक नंबरी, तर बेटा दस नंबरी असल्याचे म्हणत आदित्य ठाकरे यांच्यावर शिंदेंनी निशाणा साधला. मी मुख्यमंत्री झाल्यापासून त्यांना पोटशूळ उठला आहे. भुमरेंचा फॉर्म भरायला एवढ्या संख्येने तुम्ही आलात, त्यामुळे त्यांचा विजय पक्का आहे, असा दावा देखील शिंदे यांनी व्यक्त केला.लोकसभेच्या छत्रपती संभाजीनगर मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार संदीपान भुमरे यांनी मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या वेळी क्रांती चौक ते गुलमंडीपर्यंत रॅली काढण्यात आली होती. यात केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, अल्पसंख्याक विकास व पणन मंत्री अब्दुल सत्तार, दादा भुसे, आमदार हरिभाऊ बागडे, संजय शिरसाट, प्रदीप जैस्वाल, प्रशांत बंब, रमेश बोरणारे यांच्यासह महायुतीचे आमदार, नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने हजर झाले होते.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा आंदोलनातील नेते तथा लोकसभेसाठी इच्छुक असलेले विनोद पाटील यांची त्यांच्या घरी जाऊन भेट घेतली. विनोद पाटील यांनी काल अपक्ष म्हणून लढणार नसल्याचे सांगत माघार घेतली होती. त्यामुळे शिंदे यांनी त्यांची भेट घेतल्याने जिल्ह्यातील मतदानाचे गणित बदलू शकते, असा अंदाज देखील व्यक्त केला जात आहे. तर भेटीनंतर विनोद पाटील माध्यमांशी म्हणाले की, माझ्या घरी मुख्यमंत्री भेटायला येणे ही आनंदाची गोष्ट आहे. या भेटीत कुठलीही राजकीय चर्चा झाली नसल्याचे देखील पाटील यांनी स्पष्ट केले.

## मोदींकडे मांडायला कोणतेच मुद्दे नाहीत:त्यांच्या भाषणात सतत माझ्यावर टीका असते-शरद पवार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धाराशिव (वृत्तसंस्था)**

मोदी, अमित शहा यांचे भाषण ऐका, सर्वात जास्त माझ्यावर टीका असते. भाजपला त्यांचा पराभव आता स्पष्टपणे दिसतोय असा हल्लाबोल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केला आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचा जाहीरनामा आणि प्रचारगीत आज प्रकाशित करण्यात येणार आहे. त्यापूर्वी धाराशिवमध्ये ते पत्रकारांशी संवाद साधत होते.यावेळी शरद पवार म्हणाले, ''मोदी असोत किंवा अमित शहा, त्यांच्या भाषणात सतत फक्त माझ्यावर, उद्धव ठाकरेंवर टीका असते. गेल्या १० वर्षांपासून ते सत्तेवर आहेत. त्या काळात त्यांनी काय केले? त्याचा लेखाजोगा त्यांनी आधी जनतेसमोर मांडायला पाहिजे, उगीच मागच्या गोष्टी काढू नये'' असे शरद पवार म्हणाले.पुढे शरद पवार यांनी मोदींवर टीका केली आहे. मोदींकडे मांडायला काही नाहीच, लोकांना सांगायला काही नाही म्हणून ते आमच्यावर आरोप करत आहेत. त्यांच्याकडे दुसरे काही उद्योग नाहीत. आता जनतेने मोदींचा पराभव करण्याचा निर्णय घेतला आहे असे पवार म्हणाले.दरम्यान, पवार साहेबांनी किती कोलांट्या उड्या मारल्या याचे व्हिडीओ दाखवले, तर अवघड होईल, असे म्हणत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार यांच्यावर नुकतीच टीका केली. त्याला आता शरद पवार यांनी प्रत्युत्तर दिले आहे. फडणवीस काय म्हणतात त्याला अर्थ नाही. आपला पराभव होतोय हे आता त्यांच्या लक्षात येतंय असे पवार म्हणाले.यापूर्वीही शरद पवार यांनी भाजप सरकार आणि मोदी यांच्यावर अनेकवेळा निशाणा साधला होता. कालच सोलापूरच्या माढा लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीची सभा झाली. यावेळी शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा एक जुना व्हीडिओ दाखवला. शरद पवारांनी नरेंद्र मोदींचे जुनं भाषण ऐकले. गेले दहा वर्षे देशात भाजपकडं सत्ता आहे. मोदींच्या हातात देशाचा कारभार आहे. मात्र निवडणुकीआधी दिलेली आश्वासने पाळली गेली नाहीत. लोकांची फसवणूक सुरू आहे'', असे शरद पवार म्हणाले होते.



## परभणीतून निवडून आलो नाही तर संन्यास घेईल:महादेव जानकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**परभणी (वृत्तसंस्था)**

परभणी लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार महादेव जानकर यांनी आज एक मोठी घोषणा केली आहे. परभणी लोकसभा मतदारसंघातील मतदारांनी मला आपलेसे केले आहे. मी जवळपास ९०% मतदार संघ फिरलो आहे. येथील नागरिक माझ्या पाठीशी आहेत. या लोकसभा निवडणुकीत माझी लीड साडेचार लाखाची राहील आणि जर परभणीतून निवडून आलो नाही तर मी संन्यास घेईल, अशी घोषणाच महादेव जानकर यांनी केली आहे. परभणी लोकसभा मतदारसंघात राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर यांच्या विरोधात महाविकास आघाडीचे बंडू जाधव यांच्यात लढत होत आहे. निवडणुकीच्या प्रचारादरम्यान महादेव जानकर यांनी ही घोषणा केली आहे.

सध्या शेतकऱ्यांचा मुलगा राज्याचा मुख्यमंत्री झाला आहे. तर माझ्यासारखा बहुजनांचा मुलगा खासदार झालेला उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांना देखावत नाही का? असा प्रश्न महादेव जानकर उपस्थित केला आहे. आदित्य ठाकरे तसेच उद्धव ठाकरे हे अशा प्रकारे माझ्यावर टीका करतील, अशी मला अपेक्षा नव्हती. मात्र आता त्यांनी टीका केली आहे. २६ एप्रिल नंतर राज्यातील ज्या लोकसभा मतदारसंघात निवडणूक होणार आहे, त्या लोकसभा मतदारसंघात उद्धव ठाकरे आणि महाविकास आघाडी विरोधात आपण रान पेटवणार असल्याचा इशारा देखील जानकर यांनी दिला आहे.परभणी लोकसभा मतदारसंघातील उद्धव ठाकरे गटाचे उमेदवार संजय जाधव यांच्या प्रचारासाठी उद्धव ठाकरे यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेमध्ये उद्धव ठाकरे यांनी महादेव जानकर यांचे डिपॉझिट जप्त करा, असे आवाहन मतदारांना केले होते. उद्धव ठाकरे यांच्या या आवाहनाला महादेव जानकर यांनी आता प्रत्युत्तर दिले आहे.

दुसऱ्या टप्प्यातील मतदानाचा आज प्रचाराचा अखेरचा दिवस आहे. त्यामुळे सर्वच मतदारसंघात महायुती आणि महाआघाडीच्या नेत्यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. या मतदारसंघांमध्ये २६ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे आता प्रचाराच्या तोफा आज थंडावल्या आहेत.

## पंकजा मुंडेंनी बीडवर लक्ष केंद्रीत करावे:प्रीतम मुंडेंना नाशिकमधून लढवण्याच्या वक्तव्यावर छगन भुजबळांचा सल्ला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नाशिक (वृत्तसंस्था)**

नाशिक लोकसभा मतदार संघातून प्रीतम मुंडे यांना उमेदवारी देईल, अशी घोषणा पंकजा मुंडे यांनी केली होती. त्यावर आता छगन भुजबळ यांनी पंकजांना सल्ला दिला आहे. पंकजा मुंडे यांनी बीड लोकसभा मतदारसंघात लक्ष केंद्रीत करावे, त्या तेथून निवडून येणे महत्त्वाचे असल्याचे छगन भुजबळ यांनी म्हटले आहे. नाशिकमध्ये उमेदवार नाही ही अडचण नाही तर जास्त उमेदवार आहेत, ही अडचण असल्याचे छगन भुजबळ यांनी म्हटले आहे. इतकेच नाही तर वंजारी समाजाचेही अनेक उमेदवार आमच्याकडे असल्याचा दावा भुजबळ यांनी केला आहे. ते आज नाशिकमध्ये पत्रकारांशी बोलत होते.

नाशिक लोकसभा मतदारसंघातून मला उमेदवारी मिळाली नाही, याबद्दल मी मुख्यमंत्र्यांना दोष देत नाही. कारण त्यांची देखील अडचण होती. हा त्यांचा पारंपारिक मतदारसंघ आहे. त्यांचा विद्यमान खासदार आहे. त्यामुळे त्यांची अडचण होती. त्यामुळे त्यांना दोष देण्यात काहीच अर्थ नाही. नाशिकप्रमाणेच ओबीसी आणि इतर समाज शिरूर मध्ये देखील आहे. त्यामुळे तुम्ही शिरूर लोकसभा मतदारसंघातून लढणार का? असा प्रश्न मुख्यमंत्र्यांनी मला विचारला होता. त्यांचे हे विचारणे सहाजिक होते. त्यांचा हेतू चांगला होता. मात्र, मी नाशिक लोकसभा मतदारसंघातच राहतो आणि हा माझा मतदारसंघ आहे. निवडणुकीला उभे राहायचे म्हणून मी कुठेही जाऊन उभा राहणारा नाही. त्यामुळे मी त्यांना नाकार दिला. मी काही नाशिकसाठीही टिकीट मागितलेले नव्हते. त्यामुळे मी कुठे जाऊन उभे राहण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. त्यामुळे मी त्यांना नाकार दिला, असे देखील छगन भुजबळ यांना म्हटले आहे.राज्यभरात ओबीसी समाज आहे. त्यामुळे ओबीसी समाजाच्या रॅली दरम्यान अनेक ठिकाणी उभे राहावे, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र, मी नाशिक मतदारसंघ सोडून कुठेही लढण्याचा प्रश्नच येत नाही. मी नाशिक ऐवजी शिरूर मधून लढण्यास तयार झालो असतो तर नाशिकचा तिढा सुटला असता, असे मुख्यमंत्र्यांचे प्रामाणिक मत होते. त्यामुळेच शिंदे यांनी मला फोन करून शिरूर मधून लढण्यासाठी विचारणा केली होती, असेही छगन भुजबळ यांनी सांगितले. मला नाशिक मधून उमेदवारी मिळाली असती तर निवडून आलो असतो, असा दावा देखील यावेळी छगन भुजबळ यांनी केला आहे.

# भाजपने २२ अब्जाधीश तयार केले, आम्ही कोट्यवधी लखपती तयार करणार

## राहुल गांधींचे अमरावतीत शेतकरी कर्ज माफीचेही आश्वासन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अमरावती (वृत्तसंस्था)**

स्वातंत्र्यानंतर भारताच्या इतिहास पहिल्यांदाच संविधानावर आक्रमण होत असल्याचा दावा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते खासदार राहुल गांधी यांनी केला आहे. भाजपने २२ अब्जाधीश तयार केले आहेत. तर आम्ही कोट्यवधी लखपती तयार करणार असल्याचा दावा राहुल गांधी यांनी केला आहे. महालक्ष्मी योजनेच्या माध्यमातून कोट्यवधी महिलांच्या खात्यात दरमहा ८५०० रुपये म्हणजेच एका वर्षात १ लाख रुपये दिले जातील. यातून कोट्यवधी लखपती तयार करणार असल्याचा दावा राहुल गांधी यांनी केला आहे.

एकीकडे महाविकास आघाडी इंडिया आघाडी संविधानाचे रक्षण करण्याचा प्रयत्न करत आहे. भारतीय संविधान हिंदुस्तानच्या आवाज आहे. हे संविधान कोणीही बदलू शकत नाही. जगातील कोणतीही शक्ती संविधान बदलू शकत नाही. संविधान बदलण्याची कोणाची हिम्मत आहे, ते आम्ही पाहतो, असा इशारा देखील राहुल गांधी यांनी दिला आहे. अमरावती लोकसभा मतदारसंघातील महाआघाडीचे उमेदवार बळवंत वानखेडे यांच्या प्रचारासाठी सभेच्या आयोजन करण्यात आले होते, या वेळी राहुल गांधी बोलत होते.भारतातील शेतकरी, गरीब, बेरोजगार युवा, महिला यांचे एक रुपयाचे देखील कर्ज नरेंद्र मोदी यांनी माफ केले नाही. तर श्रीमंतांचे सोळा लाख कोटी रुपयांचे कर्ज नरेंद्र मोदी यांनी माफ केले असल्याचा दावा राहुल गांधी यांनी केला आहे. १६ लाख कोटी रुपये म्हणजे मनरेगाचे पंचवीस वर्षाचे बजेट असल्याचा देखील आरोप राहुल गांधी यांनी केला आहे. म्हणजेच पंचवीस वर्षांचा मनरेगाचा पैसा नरेंद्र मोदी यांनी २२ श्रीमंतांना वाटले असल्याचे राहुल गांधी यांनी म्हटले आहे.राज्यातील आशा आणि अंगणवाडी सेविकांचे उत्पन्न देखील दुपटीने वाढवणार असल्याचे आश्वासन राहुल गांधी यांनी दिले आहे. खासगी क्षेत्रात आणि सरकारी नोकरीत महिलांना ५० टक्के आरक्षण आम्ही देणार असल्याचे देखील राहुल गांधी यांनी म्हटले आहे. ही पहिली यादी झाली, आता दुसरी यादी देखील आम्ही देत असल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले. पहिल्या यादीमध्ये भारतातील सर्वात गरीब कुटुंबीयांना एक लाख रुपये देत आहोत तर दुसऱ्या यादीत बेरोजगार युवकांना अप्रेंटिसशिपचा अधिकार आम्ही देणार असल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले आहे.



# हिवरे बाजार येथे काल्याच्या कीर्तनाने श्री राम कथेची व अखंड हरीनाम सप्ताहाची सांगता

## जीवनात अध्यात्मिक गुरुशिवाय प्रगती अशक्य : शर्मा

लोकनेता न्यूज नेटवर्क

अहमदनगर । प्रतिनिधी

जीवनात अनेक ग्रंथ आहेत, ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी आहे तुकोबांची गाथा आहे नाथांचं भागवत आहे रामायण आहे वाल्मीकीचं रामायण आहे. नाथांचे भागवत आहे. तुलसीदासजींचे रामायण आहे. सगळे ग्रंथ घरात आहेत सगळं आहे. सगळं आहे पण तुमच्या जीवनात अध्यात्मिक गुरुशिवाय तुमची प्रगती होत नाही असं प्रतिपादन हरिभक्त परायण समाधान महाराज शर्मा यांनी केले.नगर तालुक्यातील आदर्श गाव हिवरे बाजार येथे अयोध्येतील रामलला शीलांश स्थापनेनिमित्त श्रीराम नवमीच्या आदल्या दिवशी अष्टमी ते चैत्र शुद्ध पौर्णिमेच्या दिवशी येणाऱ्या हनुमान जयंती पर्यंत श्री राम कथा उत्सवाचे आयोजन करण्यात आलं होतं. या कथेचा समारोप सोमवारी झाला आणि मंगळवारी सकाळी सभा मंडपात हरिभक्त परायण समाधान महाराज शर्मा यांचे काल्याचे किर्तन झालं त्यावेळी ते बोलत होते.काल्याच्या कीर्तनात श्रीकृष्णाचं चरित्र मांडत असताना ते म्हणाले की माणसाला आयुष्यात प्रभू श्रीरामाप्रमाणे आचरण करण्याचे गुरु सांगतात पण श्रीकृष्णासारखं वागू नये असा दंडक आहे. कारण श्रीकृष्णाने आयुष्यात जे भोगलं ते दुःख इतर कुणीच भोगले नाही असं मला वाटतं नव्हे






ते खरंच आहे. जीवनात अध्यात्मिक प्रगतीसाठी गुरु हा आवश्यकच आहे.

हे विशद करताना त्यांनी घरात पाण्याने भरून ठेवलेली घागर आणि त्यावर असलेली झाकण म्हणून ठेवलेली वाटी याचं उदाहरण त्यांनी दिल. घागर भरलेली असते. वाटी रिकामी असते. एकदा वाटीने घागरीकडे खंत व्यक्त केली की इतकी वर्ष मी तुझ्यासोबत आहे पण तू मला एक थेंब पण पाण्याचा टिपूस दिला नाही हे वाईट आहे. त्यावर घागर वाटेला म्हणाले की ज्याच्याकडून तुला काही हवं असेल त्याच्या डोक्यावर नाही तर त्याच्या पायापाशी बसले पाहिजे हे जीवनाचे सूत्र आहे. तुमच्या घराचा जेवढा प्लॉट आहे. तेवढं बांधकाम नाही. जेवढं बांधकाम आहे तेवढा दरवाजा नाही. जेवढा दरवाजा आहे तेवढी कडी नाही. जेवढी कडी आहे तेवढे कुलूप नाही. जेवढं मोठं कुलूप आहे तेवढी किल्ली नाही. आणि घर उघडण्यासाठी चावी ही लागतेच मग महत्त्व कोणाला आहे हे ओळखा.काल्याचे कीर्तनात समाधान महाराज शर्मा आणि पोपटराव पवार यांच्या हस्ते दहीहंडी फोडून काला गोळा करण्यात आला. तो प्रसाद म्हणून सर्वांना वाटण्यात आला.यावेळी या रामकथेसाठी आठ दिवस राहणाऱ्या सेवकांचा,सप्ताह कालखंडात गावातील ग्रामस्थांना मोफतपणे कीर्तनासाठी वाहतूक व्यवस्था करणारे तसेच वर्गणीव्यतिरिक्त स्वइच्छेने देणगी देणाऱ्या ग्रामस्थांचा, विविध सेवा देणाऱ्या सर्वांचा सत्कार करण्यात आला.पोपटराव पवार यांना अयोध्येत श्री राम लला मूर्ती स्थापनेसाठी विशेष निमंत्रण देण्यात आले होते. त्याची आठवण आणि पद्मश्री पुरस्कार याची क्षणचित्रे असलेलं घड्याळ सर्वांना भेट म्हणून देण्यात आल.हा सत्कार झालेला सर्वांच्या घरी हे घड्याळ कायमस्वरूपी भिंतीवर दिसेल आणि या प्रसंगाची आठवण प्रत्येक वेळेला प्रत्येकाला होईल या उद्देशाला हे घड्याळ भेट देण्यात आला आहे .महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता खांडेकर, कार्यकारी अभियंता लहामगे साहेब, उपकार्यकारी अभियंता झांजे , कक्ष अभियंता हिवरे बाजार चे साखरवडे, संभाजीनगर येथील जल सहयोग संस्थेचे पदाधिकारी आणि सदस्य , भानुदास तरटे, यांचा सत्कार करण्यात आला. महाप्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.हिवरे बाजार ग्रामविकास तरुण मंडळाने भरीव अशी मदत या सप्ताहाला दिली.

### केडगावकर नेहमीच विकास करणाऱ्यांच्या पाठीशी – सचिन कोतकर

## महायुतीचे उमेदवार डॉ.सुजय विखे यांच्या प्रचारार्थ दुचाकी रॅली

लोकनेता न्यूज नेटवर्क

अहमदनगर । प्रतिनिधी

केडगावचे भाग्यविधाते भानुदास कोतकर, माजी महापौर संदीप कोतकर, उपमहापौर सुवर्णा कोतकर यांनी केडगाव व परिसराचा विकास केला. त्यामुळे केडगाव व आसपासचा झपाट्याने विकास झाला होऊन नागरी वसाहतींत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. केडगावची जनता नेहमी विकासकामे करणाऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहते, असे असे प्रतिपादन उद्योजक सचिन कोतकर यांनी केले.



महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे यांच्या प्रचारार्थ केडगाव येथील भैरवनाथ पतसंस्था येथून दुचाकी रॅली काढण्यात आली. यावेळी मनपाचे माजी सभापती मनोज कोतकर, भूषण गुंड, जालिंदर कोतकर, नीलेश सातपुते, बापू सातपुते, सागर सातपुते, गणेश सातपुते, पोपट कराळे, बच्चन कोतकर, अजित कोतकर, उमेश कोतकर आदींसह केडगाव पंचक्रोशीतील युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.श्री. कोतकर पुढे म्हणाले की, नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे डॉ. सुजय विखे यांनी केडगावमध्ये खासदारनिधीतून मोठी विकासकामे केली. त्यांनी येथील विकासात भर घातली. मोठे उपनगर म्हणून केडगावची वेगळी ओळख आहे. विकास कामे जो करील त्याच्या पाठीशी केडगावकर उभे असतात. त्यांनी केलेल्या विकासकामांची परतफेड म्हणून आम्ही सर्व केडगावकर मतदानाच्या माध्यमातून त्यांना दाखवून देऊ. त्यांना मोठ्या मताधिक्याने निवडून देऊ. असे ते म्हणाले. यावेळी मनोज कोतकर, जालिंदर कोतकर, नीलेश सातपुते यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## केडगावमध्ये भगवान महावीर जन्मकल्याणकची रंगली शोभायात्रा

लोकनेता न्यूज नेटवर्क

अहमदनगर । प्रतिनिधी

अहिंसा परमो धर्म:ची शिकवण देऊन संपूर्ण मानव जातीच्या कल्याणाचा उपदेश करणारे भगवान महावीर स्वामींचा जन्मकल्याणक (जयंती) केडगावमध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गुरुदेव युवा मंचच्या वतीने केडगाव परिसरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत जे.एस.एस. गुरुकुलच्या विद्यार्थ्यांचे लेझीम पथक व सांस्कृतिक कार्यक्रमाने सर्वांचे लक्ष वेधले. शोभायात्रेत सनई, नगारा, चौघडा, बॅण्ड पथकासह डोक्यावर मंगल कलश घेतलेल्या मुली, विविध वेशभूषा परिधान केलेले लहान मुले-मुली, पांढरे शुभ्र वस्त्र परिधान केलेले पुरुष, केसरी, लाल साड्या परिधान केलेल्या महिला भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. या शोभायात्रेचे चौका-चौकात स्वागत करण्यात आले. शोभा यात्रेच्या अग्रभागी भगवान महावीर स्वामींची प्रतिमा असलेले रथ होते. विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने विविध



डाव सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. त्रिशलानंदन वीर की, जय बोलो महावीर की... अशा घोषणांनी परिसर दुमदुमला होता. भूषणनगर ताराबाग कॉलनी येथून शोभा यात्रेचे प्रारंभ झाले. नगर-पुणे रोड मार्गे केडगाव बस स्थानक, अंबिका बस स्थानक येथून मार्गक्रमण होऊन पाच गोडाऊन जवळील केडगाव जैन धर्मस्थानक येथे शोभा यात्रेचा समारोप झाला. यावेळी साध्वी नवीन ज्योतीजी म.सा. यांनी भगवान महावीर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.कार्यक्रमास सचिन (आबा) कोतकर यांनी भेट देवून सर्व भाविकांना भगवान महावीर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या व केडगाव जैन धर्मस्थानक परिसरात संदिप उद्योग समुहाच्या माध्यमातून पेव्हिंग ब्लॉग बसवून सुशोभिकरण करण्याचे आश्वासन दिले. मुलांनी नाटिकेतून भगवान महावीर यांनी मानव जातीच्या कल्याणासाठी दिलेली शिकवण सांगितली. महिलांनी स्वागत गीत सादर केले. यावेळी उपस्थितांनी आपले विचार मांडले. भाविकांसाठी गौतम प्रसादीचे नियोजन करण्यात आले होते.

## सांगली लोकसभा मतदारसंघाची दृष्ट काढू:कार्यकर्त्यांनी सबुरीने घेण्याचा तसेच मशाल पेटवावीच लागणार–नाना पटोले

लोकनेता न्यूज नेटवर्क

सांगली । प्रतिनिधी

सांगली लोकसभा मतदारसंघाला कोणाची तरी दृष्ट लागली आहे. ती दृष्ट आम्ही उतरवणार असल्याचा दावा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. सांगली लोकसभेची जागा काँग्रेसला न मिळाल्याने काँग्रेस कार्यकर्त्यांना जितका त्रास झाला, त्यापेक्षा जास्त त्रास मला झाला असल्याचे देखील नाना पटोले यांनी म्हटले आहे. सांगलीत काँग्रेसच्या वतीने आज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नाना पटोले यांनी सांगलीतील स्थानिक पदाधिकाऱ्यांना सबुरीने घेण्याचा सल्ला दिला आहे. इतकेच नाही तर त्यांनी कार्यकर्त्यांना समजवण्याचा देखील प्रयत्न केला. सांगली लोकसभा मतदारसंघांमध्ये आपल्याला मशाल पेटवावी लागेल, अशी भावना देखील नाना पटोले यांनी व्यक्त केली आहे.




पहिला टप्प्यातील मतदार संघामधील सर्व जागा महाविकास आघाडी जिंकणार आहे. तर दुसरा टप्पातील सर्व जागांवर विजयाचा मला विश्वास आहे. आज महाराष्ट्रातील जनता महाविकास आघाडी सोबत उभी असल्याचा दावा काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. सांगली लोकसभा मतदार संघात आयोजित काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यासाठी ते आले होते. या वेळी त्यांनी पत्रकारांशी बोलताना हा दावा केला आहे.देशाच्या स्वातंत्र्यात देखील काँग्रेसचा वाटा आहे. तर संविधान बनवण्यात देखील काँग्रेसचाच वाटा आहे. त्यामुळे संविधान वाचवण्याची जबाबदारी देखील ही काँग्रेसचीच आहे. काँग्रेसची भूमिका कायमच देशासाठी राहिली आहे आणि पुढेही राहील. देशातील नागरिकांनी दोन वेळा सोनिया गांधी यांना पूर्ण बहुमत दिले. त्यांच्याच नेतृत्वात काँग्रेसला पूर्ण बहुमत मिळाले. तरी देखील त्यांच्यावर सुषमा स्वराज यांनी अत्यंत खालच्या पातळीवर टीका केली होती. मात्र आमच्यासाठी देश महत्त्वाचा आहे, असा दावा देखील नाना पटोले यांनी केला आहे.जागा वाटपामध्ये सर्वच पक्षाच्या कार्यकर्त्यांना आपली जागा आपल्याच मिळावी असे वाटते. मात्र एकदा जागा वाटप झाल्यानंतर संघटन म्हणून सर्वजण महाविकास आघाडीसाठी कामाला लागले असल्याचे नाना पटोले यांनी म्हटले आहे. जागा वाटप पूर्ण झाले असून महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विजयी करण्यासाठी आम्ही कामाला लागलो असल्याचेही नाना पटोले यांनी म्हटले आहे.

## मनोज जरांगे मराठा समाजासाठी देव:पंकजा आणि धनंजय मुंडेंनी आरक्षणावर बोलू नये,बजरंग सोनवणेंचा बहीण भावावर पलटवार

लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । प्रतिनिधी

मनोज जरांगे मराठा समाजासाठी देव, पंकजा आणि धनंजय मुंडेंनी आरक्षणावर बोलू नये असे म्हणत बीडमधील महाविकस आघाडीचे उमेदवार बजरंग सोनावणे यांनी मुंडे बहीण भावावर निशाणा साधला आहे. तसेच दोन्ही बहीण भावाला पराभवाची घाई झाली आहे. त्यामुळे ते माझ्यावर टीका करत आहेत असेही ते म्हणालेत. बीडमध्ये भाजपच्या उमेदवार पंकजा मुंडे यांनी उमेदवारी अर्ज भरला. यानंतर जाहीर सभेतून मंत्री धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांनी राष्ट्रवादी शरद



पवार गटाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्यावर जोरदार टीका केली होती.

बहीण भावाला पराभवाची घाई या टीकेला बजरंग सोनवणे यांनी उत्तर दिले आहे. ते म्हणाले, ''दोन्ही बहीण भावाला पराभवाची घाई झाली आहे. त्यामुळे ते माझ्यावर टीका करत आहेत. त्यांनी टीका करण्यापेक्षा विकासावर बोलावे. धनंजय मुंडे यांना अहंकार झाला असून राज्यातील सर्व पक्ष मीच चालवतो असे त्यांना वाटत आहे. आम्ही कोणत्याही निवडणुकीत कधी जात आणली नाही. तेच जातीचा मुद्दा उपस्थित करत आहेत'' असा आरोप देखील बजरंग सोनवणे यांनी केला आहे.पुढे त्यांनी भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्यावर निशाणा साधला आहे. पंकजा मुंडे यांच्या प्रचार सभेत बोलताना धनंजय मुंडे यांनी मी देखील मराठा आरक्षणासाठी जिल्हा परिषदेत ठराव घेतला होता असे विधान केले होते. मात्र २००७ मध्ये बीडच्या जिल्हा परिषदेमध्ये मराठा आरक्षणाचा जो ठराव झाला होता, त्यामध्ये धनंजय मुंडे यांचे नाव कुठेही नाही आणि त्यांची या ठरावावर सही देखील नाही असे बजरंग सोनवणे यांनी म्हंटले आहे. पुढे मनोज जरांगे पाटील हे मराठा समाजासाठी देव आहेत. त्यामुळे पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांनी मराठा आरक्षणावर बोलू नये असा इशारा देखील बजरंग सोनवणे यांनी दिला आहे.दरम्यान, बीड लोकसभा मतदारसंघामध्ये महाविकास आघाडीचे बजरंग सोनवणे आणि पंकजा मुंडे यांच्यात सामना होणार आहे. बीडमध्ये चौथ्या टप्प्यात १३ मे रोजी लोकसभा निवडणुकीचे मतदान पार पडणार आहे.

## विदर्भात गारपीट तर मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात वादळी पावसाचा इशारा

लोकनेता न्यूज नेटवर्क

पुणे । प्रतिनिधी

राज्यात ढगाळ हवामानामुळे कमाल तापमानात चढ-उतार होत आहेत. हवामान विभागाने आज कोकणात उष्ण व दमट हवामानाचा, तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भात वादळी वारे, विजांसह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी गारपीटीची शक्यताही हवामान खात्याने वर्तवली आहे. मध्य महाराष्ट्र आणि परिसरावर चक्राकार वाऱ्याची स्थिती आहे. गेल्या काही दिवसांपासून मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात ढगाळ हवामान होत असून अनेक जिल्ह्यांत वादळी पावसाने तडाखा दिला. राज्यात आता पुढील चार ते पाच दिवस वादळी वाऱ्यासह हलका पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. तर पुण्यातही पुढील तीन दिवस विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे.आज जळगाव, नगर, पुणे, छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, वाशीम, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोलीमध्ये वादळी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर कोकणामध्ये उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट जारी केला आहे. पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्गमध्येही उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. त्यामुळे कुठे ऊन तर कुठे पाऊस अशी स्थिती राज्यात निर्माण झाली आहे.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४
This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904